## नांदगाव पेठ टोल नाक्यावर चक्काजाम



नांदगाव पेठ - गुरुवारी सकाळी 9 वाजता प्रहार कार्यकर्त्यांनी नांदगाव पेठ टोल नाक्यावर राष्ट्रीय महामार्गावर उतरून चक्काजाम आंदोलन केले.आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी टायर जाळून, जोरदार घोषणाबाजी करत शासनाच्या उदासीन धोरणाचा तीव्र निषेध केला. यामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णत: ठप्प झाली होती आणि वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. घटनास्थळी पोलीस यंत्रणा दाखल झाली आणि आंदोलकांना ताब्यात घेतले. या प्रकरणी नांदगाव पेठ पोलिसांनी मंगेश बबनराव देशमुख (रा. वणी, बेलखेड), आशिष भेटाळू (रा. रसुलापूर), अजय राऊत (रा. शिरजगाव कसबा), सतीश कीटूकले (रा. फुबगाव) आणि प्रदीप बंड (रा. जसापूर) यांच्याविरुद्ध बीएनएस कायद्यानुसार विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.







**अमरावती**-वर डाव्याबाजूला दिसत असलेले छायाचित्र कोण्या चित्रपटाची शुटींग नसून वास्तवात एका शेतकऱ्यांने गुरुवारी सकाळी(दि.12) कर्जापोटी केलेल्या आत्महत्येची घटना आहे. अमरावती तालुक्यातील ब्राह्मणवाडा भगत येथील 82 वर्षीय वृद्ध शेतकरी भाऊराव नथ्थुजी गोंडाने यांनी फवारणीचे औषध प्राशन करुन आपले जीवन संपविले. दुसरीकडे उजवीकडच्या छायाचित्रात माजी मंत्री बच्चू कडू अश्या शेतकरी आत्महत्या थांबविण्याकरिता राष्ट्रसंताच्या मोझरीत जीवन-मरणाचा लढा देत आहेत. गेल्या पाच दिवसांपासून अन्नत्याग करुन ते या शासनासोबत वैचारिक झुंज देत आहे. इतकं ज्वलंत वास्तव दिसत असताना हे राज्य सरकार झोपेचे सोंग घेत असेल तर हे सरकार नेमके आहे तरी कुणाचे? असा प्रश्न सामान्य जनतेला भेडसावणे सहज शक्य आहे.

# शेतकऱ्याचा संयम पाहू नका, अन्यथा महाराष्ट्राची पंजाबसारखी परिस्थिती !



### ▸ बच्चू कडूंची प्रकृती खालावली तर महाराष्ट्र पेटून उठेल ▸ मोझरीतून छत्रपती संभाजीराजे यांचा सरकारला इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 )**-शेतकऱ्यांची कर्जमाफी, पीकविमा, अपंग आणि शेतमजुरांच्या विविध मागण्यांसह एकूण 17 मुद्द्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी अमरावती जिल्ह्यातील गुरूकुंज मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा आज पाचवा दिवस असून, राज्यभरातून विविध नेत्यांचा पाठिंबा बच्चू कडूंना मिळत आहे.

आज महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी मोझरी येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून बच्चू कडूंची भेट घेतली. यावेळी त्यांनी राज्य सरकारवर सडकून टीका केली. 'हे सरकार जर खरोखरच सर्वसामान्यांचे असेल, तर मग बच्चूभाऊंच्या मागण्या चुकीच्या कशा? निवडणुकीआधी आश्वासनं देता, पण सत्तेवर आल्यावर तीच विसरता,' असा सवाल त्यांनी केला.

आंदोलनाचा 5 वा दिवस

संभाजीराजे पुढे म्हणाले की, 'जर बच्चू कडू यांची प्रकृती आणखी खालावली, तर संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठल्याशिवाय राहणार नाही.' त्यांनी कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंवरही टीका करत म्हटले की, 'कोट घालून फिरणारे कृषीमंत्री फोनवर बोलल्याचं सांगतात, पण ही वेळ कृतीची आहे. बच्चूभाऊ केवळ एक राजकीय कार्यकर्ते नाहीत, तर शेतकऱ्यांच्या वेदनांचा आवाज आहेत.'

यावेळी ऑल इंडिया पँथर सेनेचे अध्यक्ष दीपक केदार हेही उपस्थित होते. संभाजीराजे म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांचं राज्य हे रयतेचं होतं, आणि आम्हीही रयतेच्या पाठीशी उभे आहोत. शेतकरी संयमी असतो, पण त्याचा संयम संपल्यास परिस्थिती गंभीर होईल. पंजाबसारखा उद्रेक महाराष्ट्रात होऊ शकतो.' संभाजीराजेंनी बच्चू कडू यांची तब्येत बिघडू नये यासाठी काळजी घेण्याचे आवाहन केले आणि सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. आंदोलनात शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग यांचाही मोठा सहभाग असून, सरकारच्या उदासीनतेविरोधात संतप्त भावना व्यक्त केली .

### “ बच्चु कडूंच्या मरणाची वाट पाहताहेत का ? : कृषी मंत्र्यांना केला फोन

यावेळी छत्रपती संभाजी राजे यांनी कृषीमंत्री कोकाटे यांना फोन करुन म्हटले की, तुम्ही बच्चु कडूंच्या मरणाची वाट पाहताहेत का?, सरकार या आंदोलनाकडे दुर्लक्ष करत असेल तर आम्ही स्वत: अन्नत्याग करु. तातडीने निर्णय घ्या अशी सूचना मी छत्रपती शिवाजी महाराजांचा वंशज म्हणून तुम्हाला करित आहे. असेही संभाजी राजे यावेळी कृषीमंत्र्यांना म्हणाले.



### एकाही सत्ताधारी आमदार-खासदाराला रस्त्यावर फिरू देणार नाही-रोहित पवार


शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह 17 प्रमुख मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चूभाऊ कडू यांनी मोझरी येथे सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाचा आज पाचवा दिवस आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी आंदोलनस्थळी भेट दिली.यावेळी बोलताना पवार म्हणाले, शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी, अशी आमची मागणी आहे. पण सरकारने अद्याप याकडे दुर्लक्ष केले आहे. बच्चू कडू यांची प्रकृती खालावत आहे. त्यांना काही झाले तर एकाही सत्ताधारी आमदार-खासदाराला रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.त्यांनी सरकारवर सडकून टीका करत म्हटले, मंत्र्यांच्या परदेश दौऱ्यांसाठी पैसा आहे, पण शेतकऱ्यांसाठी नाही. सोयाबीन, कापूस, तूर उत्पादकांचे हजारो कोटींचे नुकसान झाले, पण सरकार गप्प आहे. भावांतर योजना नाही, कर्जमाफी नाही आणि फक्त पक्षांतर योजना सुरू आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत रोहित पवार म्हणाले की, आता हक्कासाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. विदर्भातून आवाज उठतो आहे आणि हे आंदोलन अधिक तीव्र होईल.

## राजू शेट्टींचा सरकारवर हल्लाबोल



राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत असतानाही शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीसाठी निधी नसल्याचे सांगितले जाते. '65 हजार कोटींचा समृद्धी महामार्ग झाला, बुलेट ट्रेनसाठी पैसे मिळतात, उद्योगपतींच्या 15 लाख कोटींच्या थकबाकीचे सेटलमेंट करता येते, मग शेतकऱ्यांसाठीच सरकारकडे पैसे का नाहीत?' असा सवाल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी उपस्थित केला.अमरावती जिल्ह्यातील गुरूकुंज मोझरी येथे प्रहारचे अध्यक्ष बच्चूभाऊ कडू यांनी सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाच्या पाचव्या दिवशी राजू शेट्टी यांनी भेट दिली. शेतकऱ्यांच्या 17 प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू असून, त्याला जनतेचा मोठा पाठिंबा मिळत आहे.राजू शेट्टी म्हणाले, 'महात्मा गांधींनी इंग्रजांविरुद्ध उपोषण केले होते. आता गोरे गेले आणि काळे आले, पण हे अधिक खतरनाक निघाले. बच्चू कडू उपोषणाला बसले आहेत, पण सरकारचे मंत्री भेटायला तयार नाहीत. हेच सरकार निवडणुकीपूर्वी संपूर्ण सातबारा कोरा करू म्हणाले होते, आता म्हणतात पैसा नाही. हे शेतकऱ्यांची फसवणूक आहे. आश्वासने पाळा, अन्यथा महाराष्ट्रातील शेतकरी गप्प बसणार नाही.'

## प्रहार कार्यकर्त्यांचे गरजदरी धरणात जलसमाधी आंदोलन



**अंजनगाव सुर्जी** - शेतकऱ्यांच्या संपुर्ण कर्जमुक्तीसाठी माजी राज्यमंत्री आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे सस्थापक बच्चूभाऊ कडू हे गेल्या पाच दिवसापासू मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन करित असतांना आज दि.12 जूनला अंजनगाव सुर्जी येथील प्रहार कार्यकर्त्यांनी गरजदरी धरणात जलसमाधी आंदोलनाला सुरवात केल्याने आंदोलनाची तिव्रता वाढण्याची चिन्हे दिसत आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या प्रचारात शेतर्कयाचा सातबारा कोरा करण्याचा मुद्दा प्रचाराचा केंद्रबिंदू होता आणि त्याच आश्वासनावर विद्यमान सरकार सत्तेत आले असतांना शेतर्कयांची कर्जमुक्ती करणूयाचे आश्वासन हवेत विरल्याचे दिसून येत असल्याने प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चूभाऊ कडू यांनी शेतकय्र्यांच्या संपुर्ण कर्जमुक्तीसाठी गुरुकुंज मोझरी येथे अअन्नत्याग आंदोलन सुरु केले.या आंदोलनाची धग दिवसेदिवस वाढत आहे.इंज दि.12 ला बच्चूभाऊ कडु यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ प्रहारचे अंजनगाव सुर्जी तालूक्यातील कार्यकर्ते गरजदरी येथिल धरणात उतरुण जलसमाधी आंदोलन करित आहे.या आंदोलनात प्रहारचे उपजिल्हाप्रमुख शंभु मालठाणे,सनी शेळके,बाळू रोंघे ,बाला शेरकर, निशांत खारोडे, अरुण शवाने, करण मरसकोल्हे, आकाश खारोडे, छोटू अढाऊ, बाळू मोहोड, श्याम धुमाळे, रोशन धुमाळे, कृष्णा शेंडे, शिवा रोंघे, प्रशांत बावनथळे, राहुल धानोरकर, दिप भूडरकर, ओम धुमाळे, शुभम खारोडे, बजरंग पातोड, दीपक सदार ,शुभम महल्ले, प्रणव उईके, निरंजन गावंडे, स्वयम ठाकरे, नितीन इंगळे, तेजस शेलकर,हर्षल शेलकर, शुभम निमकाळे , प्रतीक भिसे , अनंता मते, निखिल कडू, धीरज नागोसे, नाना उईके, आशिष शेलकर, कार्तिक उईके रोशन लोंधें, सुनील उके संजू चोरे उपस्थित होते. सायंकाळी पाच वाजता प्रशासनातर्फे ठाणेदार प्रकाश अहिरे यांनी आंदोलन करताना विनंती करून व आंदोलन कर्त्याचे निवेदन स्वीकारून तात्पुरते आंदोलन स्थगित केले व तुमच्या मागण्या शासन दरबारी लवकरात लवकर पोचण्याचे आश्वासन दिले यावेळी तालुक्यातील शेकडो नागरिक व मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त होता.

### समर्थन देणारे खासदार ( पत्र )

खा.बजरंग सोनवणे, खा.फौजिया खान , खा.विशाल पाटील, खा.भास्कर भगरे,खा.ओमराजे निंबाळकर ,खा.रविंद्र चव्हाण ,खा.कल्याण काळे.

### समर्थन देणारे आमदार ( पत्र )

आ.विश्वजीत कदम, आ.रोहित पाटील, आ.रईस शेख, आ.विजयसिंह पंडीत, आ.विजय वडेट्टीवार, आ.संदीप क्षिरसागर, आ.प्रकाश सोळंके(सत्ताधारी), आ.प्रविण स्वामी, आ.अमित झनक, आ.राहूल पाटील, आ.रोहित पाटील, आ.विजयसिंह पंडीत,आ.शौकत शेख.

### आतापर्यंत उपोषण मंडपाला भेट देणारे नेते

राकेश टीकैत (शेतकरी नेते), छत्रपती संभाजी राजे (माजी खासदार), मनोज जरांगे पाटील (मराठा नेते), राजु शेट्टी (अध्यक्ष,स्वाभीमानी शेतकरी संघटना), महादेव जानकर (अध्यक्ष,राष्ट्रीय समाज पक्ष), वसंतराव पुरके (माजी मंत्री, काँग्रेस), अमर काळे (खासदार) सचिन ढवळे, सलिल देशमुख, विठ्ठल कांगणे, नितीन बाप्पु देशमुख (उबाठा शिवसेना नेते), रविकांत तुपकर (शेतकरी नेते), निलेश लंके (खासदार), रोहित पवार (आमदार), राहूल पाटील (आमदार), गजानन लवटे (आमदार), नितेश कराळे मास्तर (राजकारणी)

## वरुडमध्ये झटामझिरी येथे जलसमाधी आंदोलन



**वरूड**-तालुक्यातील झटामझिरी येथे आज शेतकरी व शेतमजुरांनी मोठ्या संख्येने एकत्र येत धरणात जलसमाधी आंदोलन करून मोझरी येथे सुरु असलेल्या बच्चूभाऊ कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा दिला. गावातून रॅली काढत महिला व पुरुष धरणात उतरले आणि सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत निषेध नोंदवला.झटामझिरी येथे झालेल्या या आंदोलनात अनेक प्रतिष्ठीत ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले. यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे, बिरसा मुंडा समितीचे जिल्हाध्यक्ष कमल मीनारायण उइके, सरपंच हिराकांत उईके, ?ड. वाढिवे नीलकंठ (बाळा पाटील), प्रहारचे प्रणव कडू, अजय चौधरी, प्रफुल गोहाड आदींसह शेकडो नागरिक सहभागी झाले होते.आंदोलनस्थळी तहसीलदार आणि वरूड पोलीस स्टेशनचे ठाणेदार पोलीस कर्मचाऱ्यांसह उपस्थित होते. तहसीलदारांनी निवेदन स्वीकारून शासनाकडे मागण्या पोहोचवण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. मात्र, जर मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, तर यापुढे उग्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला.शासनाने निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण न करता शेतकऱ्यांना दुर्लक्षित केल्यामुळे शेतकरी वर्गामध्ये प्रचंड नाराजी आहे. त्यामुळे अशा आंदोलनांना जनतेचा पाठिंबा वाढत असून, सरकारने त्वरित निर्णय न घेतल्यास राज्यभर मोठा शेतकरी आक्रोश उभा राहू शकतो, हे चित्र स्पष्ट दिसत आहे.

### प्रहारचे माजी आमदारही गायब ?

प्रहार च्या तिकीटावर अख्खी पंचवार्षिक ज्यांनी आमदारकी भोगली असे मेळघाटचे माजी आमदार राजकुमार पटेल या आंदोलनातून गायब दिसत आहेत. मुलाच्या लग्नाचे कारण देत कदाचित त्यांनी येथून आपले पावले मागे घेतले असावे, अशी चर्चा इतर प्रहार कार्यकर्त्यांमध्ये होत आहे.

## धामणगाव बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद



धामणगाव रेल्वे-मोझरी येथे सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनार्थ प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने धामणगाव बंदचे आवाहन करण्यात आले होते. या बंदला शहरवासीयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, संपूर्ण धामणगाव शहर आज बंद राहिले. प्रहारचे जिल्हाध्यक्ष प्रवीण हेंडवे यांच्या नेतृत्वाखाली शास्त्री चौक येथे सरकारविरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी बच्चू कडू यांच्या मागण्या त्वरीत मान्य करण्याची मागणी करत शासनाच्या निष्क्रियतेचा तीव्र निषेध केला. धामणगाव येथील बंद आणि निदर्शनात अनेक प्रहार कार्यकर्ते आणि पदाधिकारी सहभागी झाले होते. यामध्ये जिल्हाध्यक्ष प्रवीण हेंडवे, तालुकाध्यक्ष सूरज गंथडे, निलेश जयसिंगपुरे, अमर गायधने, प्रशांत थोटे, शैलेश टाले, अक्षय धोपटे, प्रवीण रोहनकर, सुधाकर बर्डे, छोटू काकडे, नागेश सोनोने, दीपक पारखंडे, बंडू भोयर, विजय वानखडे, शेख अमीर, राजू नांदुरकर, निखिल मिसाळ, स्वप्नील जायले, अमर काकडे, संदीप धांदे, नितीन हिंगे, दानिश पठाण, प्रणय डावरे, फिरोज पठाण, आशु नरुळे, सौरभ वानखडे, किशोर जाधव, संतोष तुमसरे, पंकज काळे आदींसह मोठ्या संख्येने प्रहार कार्यकर्ते उपस्थित होते.

उर्वरित पान क्र.०६


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# भंडारजला वादळी पावसाचा तडाखा





## ग्रामपंचायत, आरोग्य केंद्र, शिवमंदिरावर झाडे कोसळून मोठे नुकसान

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी** (दि.12) – अंजनगाव सुर्जी तालुक्यात कालपासून हवामानात अचानक बदल होत असून काही भागांत वादळी वाऱ्यांसह पावसाने हजेरी लावली आहे. याच दरम्यान, आज दि. 12 जून रोजी दुपारी सुमारे 4 वाजता भंडारज व कारला गावाला चक्रीवादळाचा जोरदार फटका बसला.

तसेच कारला आणि तुरखेड या गावांमध्येही वादळ व पावसामुळे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच भंडारजचे तलाठी मनोज रुमाले, सरपंच राजू पाटील निचळ, सचिव प्रवीण गिरे, हिरापूरचे तलाठी धीरज मिश्रा यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामे सुरू केले आहेत.नागरिकांनी प्रशासनाकडे नुकसानग्रस्तांना तातडीची मदत देण्याची मागणी केली आहे. विशेषत: सुधाकर गीते यांचे नुकसान अधिक असल्याने त्यांनी महसूल विभागाकडे आर्थिक मदतीची विनंती केली आहे. वादळी पावसामुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.



### महामार्गही एक तास ठप्प

वादळी वाऱ्यांमुळे भंडारज गावात अनेक जुनी झाडे उन्मळून पडली. या झाडांपैकी काही ग्रामपंचायत कार्यालय, आरोग्य उपकेंद्र आणि शिवमंदिरावर कोसळली, त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच गावातील चार हॉटेल्सचे छत व इतर संरचना उडाली. विशेषत: सुधाकर पांडुरंग गीते यांच्या घराचे टिन व छप्पर उडून गेल्याने घरातील गृहउपयोगी वस्तूंना मोठे नुकसान पोहोचले आहे.गावातील जुने पिंपळ आणि इतर आठ झाडे वाऱ्याच्या जोरामुळे जमीनदोस्त झाली आहेत. राज्य महामार्गावर झाड कोसळल्यामुळे या मार्गावरील वाहतूक तब्बल एक तास ठप्प झाली होती, त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

शेष पृष्ठ ३ वरून...

## पाच दिवसांत बच्चू कडूंच्या समर्थनार्थ झालेली आंदोलनं

| ठिकाण | आंदोलनाचा प्रकार |
|---|---|
| चांदुर बाजार | विश्रोळी धरणावर जलसमाधी, मुंडण आंदोलन |
| अचलपूर | टॉवर आंदोलन, एसडीओंना घेराव |
| आसेगाव पुर्णा | टॉवरवर चढून आंदोलन |
| डवरगाव (ता. तिवसा) | अर्धदफन आंदोलन |
| अमरावती – नांदगाव पेठ | टोलनाक्यावर रास्तारोको |
| मोझरी (ता. तिवसा) | रास्तारोको |
| अचलपूर ङ्क (चांदूर बाजार नाका) | टायर जाळून रास्तारोको |
| चांदूर बाजार | महिलांचा तहसीलदारांना घेराव |
| पिंपरी पुर्णा | अन्नत्याग आंदोलनास सुरुवात |
| अंजनगाव सुर्जी | गरजदरी धरणामध्ये जलसमाधी आंदोलन |
| वरुड झटामझिरी | धरणावर जलसमाधी आंदोलन |
| धामणगाव रेल्वे | दुकाने बंद, चक्काजाम आंदोलन |
| आर्वी (जि. वर्धा) | अर्धनग्न आंदोलन, मंत्री केचे यांची वाहन अडविले |
| अकोला | मुख्यमंर्त्यांना काळे झेंडे दाखविले |
| मुंबई | मंत्रालयासमोर दिव्यांगांची निदर्शने |
| परभणी | चक्काजाम आंदोलन |
| नाशिक | रास्तारोको आंदोलन |
| उमरखेड (यवतमाळ) | शासनाचे पिंडदान |
| वर्धा | चक्काजाम |
| नागपूर – मौदा | मंत्री बावनकुळे यांच्या मतदारसंघात आंदोलन |



**अचलपूर**–येथील चांदूर बाजार नाक्यावर प्रहार कार्यकर्त्यांनी रास्तारोको करित टायर जाळले. यावेळी या कार्यकर्त्यांशी एसडीपीओ शुभम कुमार यांनी हुज्जत घातल्याने परिस्थिती चिघळली होती. त्यानंतर या कार्यकर्त्यांना ताब्यात घेवून अचलपूर पो.स्टे.ला नेण्यात आले.

## स्थानिक काँग्रेसचे इतर पदाधिकारी बेपत्ता

काँग्रेसचे डॉ.सुनिल देशमुख गुरुवारी सायंकाळी बच्चु कडू यांच्या भेटीला पोहोचले मात्र स्वत– खासदार बळवंत वानखडे किंवा तिवसा मतदारसंघाच्या माजी आमदार यशोमती ठाकुर यांच्यासह स्थानिक काँग्रेसचे इतरही पदाधिकारी या आंदोलनापासून लपून आहेत. कदाचित बच्चू कडूंशी हाडवैर असलेले काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या दबावाखाली इतर पदाधिकाऱ्यांना इच्छा असताना जात येत नसावे असे वाटत आहे.

## 14 जून रोजी राज्यभर चक्का जाम

बच्चू कडूंच्या अन्नत्याग उपोषण कडे राज्य शासनाने लक्ष वेधावे यासाठी दिनांक 14 जून रोजी राज्यभर चक्का आंदोलन करण्याचा इशारा स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे नेते राजु शेट्टी यांनी दिला आहे.

# चप्पल स्टँडमधील किल्ली वापरून घरफोडी

## काही तासांतच आरोपी अटकेत

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.12 )**–चप्पल स्टँडमधील बुटात ठेवलेली घराची किल्ली वापरून सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण 86 हजारांचा ऐवज चोरणाऱ्या चोरट्याला वरुड पोलिसांनी काही तासांत अटक केली. ही घटना वरुड शहरातील मुलताई रोडवरील गुरुद्वारासमोरील मोर परिसरात घडली.

सविता गजानन ब्राम्हणे (वय 39) या आपल्या आईकडे गेल्या होत्या. जाण्यापूर्वी त्यांनी घराच्या दरवाजाची किल्ली चप्पल स्टँडमधील बुटामध्ये ठेवली होती. या संधीचा फायदा घेत आरोपी संजय ऊर्फ रामजाने जयप्रकाश श्रीवास्तव (रा. आठवडी बाजार, वरुड) याने ही किल्ली काढून घराचा दरवाजा उघडला आणि बेडरूममधील



अलमारीतून 25 ग्रॅम 300 मि.ली. वजनाचे सोन्याचे झुंबर, अंगठ्या, रिंग आणि इतर दागिने व 2500 रुपये रोख असा एकूण 86 हजार रुपयांचा माल चोरून नेला. या घटनेच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी गुन्हा नोंदविला. त्यानंतर वरुड पोलिसांनी तत्परता दाखवत काहीच तासांत आरोपी संजय श्रीवास्तव याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# 15 लाखांच्या बनावट लुटीचा पर्दाफाश

## बँक अधिकाऱ्याची खोटी योजना उघड
## ठेवीदारांची सहानुभूती मिळवण्यासाठी रचला बनाव
## बँक व्यवस्थापकावर गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 )**– यवतमाळ जिल्ह्यातील नेर येथील अमरावती महिला अर्बन क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या मॅनेजिंग डायरेक्टर अंकुश अरुण राऊत (32) याने पोलिसांना 15 लाख रुपयांच्या बनावट लुटीची माहिती देत खळबळ उडवून दिली होती. मात्र पोलिसांच्या कसून तपासात ही घटना बनावट असल्याचे उघड झाले असून फक्त ठेवीदारांची सहानुभूती मिळवण्यासाठी व वेळ मारून नेण्यासाठी त्याने हा बनाव रचल्याचे त्याने कबूल केले आहे.

11 जून रोजी दुपारी सुमारे 12 वाजता अंकुश राऊत याने नांदगाव खंडेश्वर पोलिस ठाण्यात तक्रार दिली की, मी यवतमाळच्या नेर येथून अमरावती ग्रामीणमधील कुऱ्हा शाखेत 15 लाख रुपये जमा करण्यासाठी जात असताना वाघोळा ते खरबी दरम्यान काळ्या रंगाच्या पल्सर मोटारसायकलवरून आलेल्या दोघा अज्ञात व दुप्पट्टा बांधून असलेल्या व्यक्तींनी चाकू दाखवून माझा पैशांचा बॅग लुटून नेला. या माहितीने पोलीस यंत्रणेत खळबळ माजली. या घटनेची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय अधिकारी अशोक थोरात व ग्रामीण गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र तपासाच्या दरम्यान आरोपीचे जबाब व घटनास्थळी मिळालेले पुरावे, यामध्ये स्पष्ट विसंगती आढळून आली. पोलिसांनी त्याची सखोल चौकशी केली असता, ही लूट मुळात घडलीच नसल्याची कबुली अंकुश राऊत याने दिली. तपासात उघड झाले की, सोसायटीकडे ठेवीदारांचे पैसे परत देण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नव्हता. त्यामुळे थोडा वेळ मिळावा व ठेवीदारांची सहानुभूती मिळवता यावी म्हणून त्याने बनावट लुटीची योजना रचली आणि पोलिसांना खोटी माहिती दिली. या प्रकरणी नांदगाव खंडेश्वर पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात अदखलपात्र (नॉन-कॉग्निजेबल) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.



# द ग्रेट मराठा संघटनेचा मोर्चा धडकला नगरपरिषदेवर

## नागरिकांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.12 )** – शहरातील नागरी समस्या आणि विविध मागण्यांसाठी द ग्रेट मराठा संघटनेने गुरुवार, 12 जून रोजी दुपारी 12 वाजता नगरपरिषदेवर जोरदार मोर्चा काढला. या मोर्चामध्ये शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. मोर्चाचे नेतृत्व संघटनेचे सर्वेसर्वा नितीन गुर्जर यांनी केले.

मोर्चादरम्यान नगरपरिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी अनुपस्थित होते. त्यामुळे संतप्त नागरिकांनी मुख्याधिकाऱ्याच्या रिकाम्या खुर्चीला निवेदन सादर करत आपला रोष व्यक्त केला. आंदोलनकर्त्यांनी शहरातील नाल्यांची स्वच्छता, पावसाळ्यापूर्वीचे नियोजन, नियमित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, आणि विद्युत समस्यांचे निराकरण यांसह विविध मागण्या मांडल्या.

या वेळी उपस्थित स्वच्छता निरीक्षकांनी आंदोलकांच्या मागण्यांचे गांभीर्य ओळखून त्वरित तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे नितीन गुर्जर आणि आंदोलकांनी आपला मोर्चा तात्पुरता मागे घेतला. मात्र, आठ दिवसात मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. नागरिकांच्या मते, मागील काही महिन्यांपासून नगरपरिषद पूर्णपणे रामभरोसे चालत असून प्रभारी मुख्याधिकारी अन्य शहराचाही प्रभार सांभाळत असल्यामुळे वरुड शहरातील प्रशासन निष्क्रिय झाले आहे. त्यामुळे रस्त्यांवरील खड्डे, घाणेरडे नाले, अनियमित वीजपुरवठा आणि पाण्याचा तुटवडा यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या आंदोलनात डॉ. महेंद्र राऊत, गिरीधर देशमुख, विनय शहा, अशोक नानोटकर, दिलीप खेरडे, रितेश शहा, लोकेश अग्रवाल, किशोर तडस, सोनल अग्रवाल, अभिजीत चव्हाण, रवी गेहलोद, राजू सिरसकर, समीर शहा, जमीर पटेल, अमित करीया, यशपाल राऊत, रोशन धोंडे, योगेश श्रीराव आणि इतर कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग होता. मोर्चा शांततेत पार पडला असून प्रशासनाकडून मागण्या मान्य न झाल्यास शहरात पुन्हा मोठे आंदोलन उभारले जाईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

# खंडेलवाल ज्वेलर्समधून 13 लाखांचे सोन्याचे दागिने लंपास!

## पोलिसांकडून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.12 )**–शहरातील केदार चौकात असलेल्या नामांकित खंडेलवाल ज्वेलर्स या दागिन्यांच्या दुकानातून तब्बल 13 लाख 1 हजार 600 रुपयांचे, एकूण 127 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने गहाळ झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खंडेलवाल ज्वेलर्समध्ये दर महिन्याच्या अखेरीस नियमितपणे स्टॉकची तपासणी केली जाते. 14 मे रोजी झालेल्या तपासणीत सर्व दागिने व्यवस्थित होते. मात्र 3 जून रोजीच्या मासिक तपासणीत 8 नग बांगड्या, 2 जोड कानातले आणि 1 सिंगल जोड कानातले अशा 127 ग्रॅम सोन्याचे दागिणे कमी आढळून आले. दागिन्यांची एकूण किंमत सुमारे 13,01,600 रुपये असल्याचे मॅनेजमेंटने स्पष्ट केले. या प्रकारामुळे दुकान व्यवस्थापनात खळबळ उडाली असून, जनरल मॅनेजर राजेश जोखवाल नागलिया यांनी यासंदर्भात वरुड पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीनंतर अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल गडेकर करत असून, वरुड पोलिस ठाण्याचे ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यवाही सुरु आहे. पोलिसांनी दुकानातील सीसीटीव्ही फुटेज, कर्मचारी तपशील आणि इतर पुरावे गोळा करण्याचे काम सुरू केले आहे.

# वादळी पावसामूळे सेमाडोह, माखला येथील घरांचे नुकसान

## आमदार केवलराम काळे यांच्याकडून पाहणी



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.12 )** – मेळघाट परिसरात आलेल्या मुसळधार पावसामुळे सेमाडोह व माखला या गावातील अनेक घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. घरांची भिंत कोसळणे, छप्परे उडणे यासारखी नुकसान झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आज आमदार केवलराम काळे यांनी प्रत्यक्ष दौरा केला. त्यांच्यासोबत चिखलदरा तहसीलदार, तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच आणि संबंधित विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. दौऱ्यादरम्यान आमदारांनी प्रत्येक नुकसानग्रस्त कुटुंबाची भेट घेऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. 'नुकसानग्रस्त नागरिकांना तातडीने मदत मिळाली पाहिजे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब खपवून घेतला जाणार नाही,' असे स्पष्ट निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. तसेच पंचनामे त्वरित पूर्ण करून अहवाल शासनाकडे सादर करण्याचे आदेश दिले. तहसीलदार जीवन मोरणकर यांनी यावेळी सांगितले की, 'पंचनाम्याचे काम तत्काळ सुरू करण्यात आले असून सर्व अहवाल लवकरच तयार करून शासनाकडे सादर करण्यात येईल.' ग्रामस्थांनी आमदारांशी संवाद साधताना आपली व्यथा मांडली. यावर आमदार काळे यांनी त्यांना आश्वासन दिले की, 'प्रत्येक नुकसानग्रस्त कुटुंबाच्या मदतीसाठी शासन आणि मी स्वत:ही खंबीरपणे पाठीशी उभा आहे.' या दौऱ्यात गजानन काकड, सरपंच, उपसरपंच व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाकडून पंचनामे पूर्ण होताच शासनाच्या माध्यमातून आर्थिक मदत लवकर मिळावी, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

### पर्यटन संकुलावर कोसळले झाड



पावसासोबत आलेल्या वादळामुळं सेमाडोह पर्यटन संकुलात अनेक झाडं कोसळली, तर सेमाडोहपासून 12 किलोमीटर उंच पर्वतावर वसलेल्या माखला गावात अनेकांच्या घरांची पडझड झाली. वादळी पावसामुळं सेमाडोह पर्यटन संकुल परिसरात आठ ते दहा मोठी झाडं खाली कोसळली. काही झाडं यामुळं पर्यटकांच्या निवासासाठी बांधण्यात आलेल्या घरांवर कोसळल्यामुळं काही घरांच्या छताला भेगा पडल्या. बुधवारी सुदैवानं पर्यटन संकुलात कोणीही पर्यटक नव्हते. पर्यटन संकुल परिसरात झाडं कोसळल्यामुळे दुसऱ्या भागात जाणंदेखील कठीण झालंय. वादळामुळं परिसरात विजेची तार तुटलीय. संकुल परिसरात मोठं नुकसान झालं, अशी माहिती सेमाडोह वन परिक्षेत्र अधिकारी प्रदीप तळखंडकर यांनी दिली.

